PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# सामाजिक नियंत्रण व पांढरपेशीय गुन्हेगारी

**प्रा.गडकरी पी. वाय.**

सहायक प्राध्यापक व विभागप्रमुख
समाजशास्त्र विभाग,
सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद,
जि.जालना. **महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

सामाजिक नियंत्रण प्रत्येक समाजामध्ये अपरिहार्य असते. समाजाच्या अस्तित्वासाठी व संवर्धनासाठी हे कार्य महत्त्वाचे आहे. सामाजिक ऐक्य, सातत्य, सुरक्षितता, सामाजिक स्वीकृती, सहकार्य, सामाजिक शिस्त, सामाजिक कर्तव्याची जाणीव करुन देणे ही अत्यंत महत्त्वाची कार्ये सामाजिक नियंत्रणाद्वारे पार पाडली जातात. प्रत्येक व्यक्ती समाजामध्ये वावरत असतांना आपआपल्या हितसंबंधाची जोपासना करण्याचा प्रयत्न करीत असते. हे करीत असतांना व्यक्तींनी स्वतःचे स्थान व दर्जानूसार आपल्या कर्तव्याचे पालन करावे यासाठी सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून प्रयत्न होत असतात. सामाजिक नियंत्रणामध्ये प्रामुख्याने तीन प्रकारचे प्रभावी घटक आढळतात.

1) संपूर्ण समाजाचे वर्चस्व

2) एक विशिष्ट समूहाचा दुसऱ्यावर प्रभाव वा वर्चस्व.

3) एक समुहाचे त्या समुहाच्या सभासदांवर प्रभाव वा नियंत्रण.

समाजाचे स्वरुप परिवर्तनशील असते. हे परिवर्तन काळानुरुप स्थळानुरुप वेगवेगळे दिसून येते. प्रत्येक समाजाला शांतता, सुव्यवस्था व स्थैर्य यांची गरज असते. समाजामध्ये अशांतता असेल तर समाज सातत्याला अडथळा निर्माण होतो. समाजाच्या कल्याणाकरिता व्यक्तींच्या गरजा, अनिर्बंध, इच्छा, आकांक्षा यांना निर्बंध घालणे गरजेचे असते. याकरिता सामाजिक नियंत्रण महत्त्वाचे ठरते. समाजातील व्यक्तींचे वर्तन हे सामाजिक आकृतीबंध व सामाजिक मूल्यांनूसार निश्चित केलेले असते व त्या आधारेच व्यक्ती वर्तन करतात. समाजबाह्य वर्तनाला निर्बंध घालण्याची


SECOND INTERNATIONAL CONFERENCE ( ICDBVIHCIM 2018 ) 6-7 OCTOBER 2018
SPECIAL ISSUE –OCT 2018 www.puneresearch.com/times (MS) INDIA
(IMPACT FACTOR 3.18) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

व्यवस्था सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून होत असते. व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजांतर्गत रुढी, परंपरा, नैतिक मुल्ये, आदर्श, संकेत, लोकाचार, कायदे आदी शक्ती कार्यरत असतात. याच्या आधारे समाज व्यक्तींद्वारा साचेबध्द वर्तन घडवून आणते.

सामाजिक नियंत्रणाच्या व्याख्यांचे अध्ययन केल्यास सामाजिक नियंत्रण समजणे सहज शक्य होईल.

1) **रॉस एडवर्ड** :— "सामाजिक नियंत्रण म्हणजे अशी साधने की, ज्यांच्या माध्यमातून समाज आपल्या सदस्यांना स्वीकृत वर्तन प्रतिमानांचे अनुकरण करावयास शिकविते."

2) **डॉ.बांटमोर** :— "जी मुल्ये व नियमने यांच्या योगाने व्यक्ती—व्यक्तींमधील आणि समुहा—समुहातील ताण व संघर्ष विघटीत करुन अगर प्रशमित करुन एखाद्या मोठ्या समावेशक गटाचे ऐक्य जी मुल्ये व नियमने टिकवितात व ज्या व्यवस्थेनूसार ती मुल्य व नियमने प्रसारित केली जातात व व्यक्तीच्या मनात रुजविली जातात त्या सर्वांच्या समुच्चयाला सामाजिक नियंत्रण म्हणतात."

3) **फेअरचाईल्ड** :— "ज्या प्रक्रियेमुळे समाज किंवा समाजातील कोणताही समूह आपल्या घटकांकडून मग ते घटक समूह असोत अगर व्यक्ती असोत आपल्या अपेक्षांना अनुरुप असे वर्तन घडवून आणतो त्या प्रक्रियांचा समुच्चय म्हणजे सामाजिक नियंत्रण होय."

4) **गिलीन** :— "सामाजिक नियंत्रण ही अशी एक व्यवस्था आहे की, ज्याद्वारे समाज आपल्या एखाद्या समूह किंवा उपसमुहाला, आपल्या सभासदांना, समाजमान्य वर्तन प्रकारांना अनुरुप असे वर्तन करण्यास्तव सूचना देणे, अनुनय करणे, निर्बंध घालणे, मन वळविणे व भौतिक बळाचा वापर करणे यापैकी कोणत्याही साधनांचा वापर करतो."

वरील सर्व व्याख्यांचा अभ्यास केला असता काही ठळक मुद्दे लक्षात येतात.

1) सामाजिक नियंत्रण ही प्रक्रिया सार्वत्रिक स्वरुपाची आहे.

2) व्यक्ती व समाजावर प्रथा, लोकाचार, लोकनिती, धर्म, कायदे, रुढी याद्वारे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवले जाते.

3) प्रतिकात्मक साधनांच्या भौतिक बळाचा वापर होतो.

4) यात नियोजनबध्दता व अनियोजन असते.

5) व्यक्ती आणि समाजाने प्रमाणकानुरुप वर्तनाची अनुरुपता, ऐक्य, सातत्य यांची अपेक्षा यात अभिप्रेत असते.

समाजमुल्य, प्रमाणके या नियंत्रक साधनाद्वारे समाजव्यवस्थे विषयीचे ज्ञान, माहिती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करीत असतो व त्यातून सामाजिक व्यवस्थेच्या संतूलनामध्ये सातत्य राखले जाते.

**लॅंडिस पी.एच.** :– "सामाजिक नियंत्रण एक प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे समाजव्यवस्था स्थापित केली जाते व टिकवून ही ठेवली जाते, त्यास सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.

**शेपर्ड–ओडोम आणि ब्रुटन** :– "समाजातील व्यक्तींना नियमांचे व मुल्यांचे अनुकरण करण्यास भाग पाडणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियंत्रण होय."

मानवाच्या स्वैर व स्वार्थी प्रवृत्तींवर नियंत्रण असले तरच समाजामध्ये स्थैर्य टिकून राहील. समाजाला एकसंघ ठेवून सामाजिक मुल्य, प्रमाणके, आदर्श प्राप्त करण्याकरिता सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता असते. समाजामध्ये परस्पर सहकार्याची भावना निर्माण करण्यासाठी सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता असते. सामाजिक नियंत्रणाच्या नियमांचे, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना त्या त्या प्रमाणे दंड व शिक्षा सर्व समावेशक दिली जाते. त्यामध्ये कुठल्याही पक्षपातीपणा नसतो.

**सामाजिक नियंत्रणाची प्रमुख साधने** :–

बऱ्याच समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचा उल्लेख केला आहे.

**1) रॉस** :– सामाजिक नियंत्रणाच्या साधनात परंपरा, नैतिकता, सुचना, जनमत, धर्म, कायदा इ. साधने सांगितलेली आहे.

**2) होज** :– यांनी दोन स्वरुपाची सामाजिक नियंत्रणाची साधने सांगितली आहेत.

1. मान्यतेच्या आधारे नियंत्रण – बक्षिस किंवा शिक्षा
2. अनुकरण व सुचनांद्वारे नियंत्रण – शिक्षा आणि कुटूंबाद्वारे नियंत्रण साधले जाते.

**3) किंबल यंग** :– (1) सकारात्मक नियंत्रण – बक्षीस, (2) नकारात्मक नियंत्रण – शासन ही दोन प्रकारची साधने सांगितली आहेत.

**4) बर्नाड** :– 1) जाणीवेच्या पातळीवर नियंत्रण कायद्याच्या माध्यमातून साधले जाते.

2) नेनीवेच्या पातळीवरील नियंत्रण ईश्वराबद्दलच्या भयाद्वारे साधले जाते.

**5) कार्य मॅनहिम** :— प्रत्यक्ष नियंत्रण, कुटूंब, नातेवाईक व सवंगडी गटाद्वारे साधले जाते असे नमूद केले असून अप्रत्यक्ष नियंत्रणाच्या साधनात विविध मंडळे, शासनाद्वारा तयार केलेले कायदे यांचा उल्लेख केला आहे.

**सामाजिक नियंत्रणाची साधने** :—

समाज संमत मार्गाने प्रतयेक व्यक्तीस जावे लागते. ह्या समाज संमत मार्गाने जाण्यास भाग पाडण्यासाठी कुटूंब, धर्म, शाळा इत्यादी अनेक संस्था वेगवेगळ्या तंत्राचा वापर करीत असतात. सामाजिक नियंत्रणाची काही माध्यमे खालीलप्रमाणे सांगता येतील.

1) **कुटूंब** :— सामाजिक नियंत्रणात कुटूंबाला महत्त्वाचे स्थान आहे. कुटूंबाद्वारे अनेक प्रकारचे संस्कार करुन त्याला चांगला माणूस बनविले जाते. व्यक्तींच्या सामाजीकरणात कुटूंबाचे स्थान महत्त्वाचे आहे. प्रगत व गुंतागुंतीच्या समाजात कुटूंब सामाजिक नियंत्रणात तितकेसे प्रभावी ठरत नाही. उदा. शहरी जीवनातील कुटूंब, ग्रामीण भागात सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीने कुटूंबाला फार महत्त्वाचे स्थान असते. कुटूंबाच्या ध्येय धोरणास अनुसरुन व्यक्तीला वागावे लागते.

2) **धर्म** :— मानवी वर्तन व व्यवहाराला नियंत्रित ठेवणारी धर्म ही एक अद्भुत शक्ती आहे. मानवी मन स्वैर धावू लागल्यास धर्माचा लगाम त्यांना योग्य मार्गावर आणतो. सर्व सृष्टी ही एक अलौकिक शक्तीने नियंत्रित केली आहे ती शक्ती म्हणजे ईश्वर. ही शक्ती आपले बरे—वाईट करु शकते अशी भीती धर्म दाखवितो. समाजातील प्रत्येक व्यक्तीची शक्ती तिच्या व समुहाच्या कल्याणासाठी उपयोगात आणण्याच्या दृष्टीने धर्म व्यक्तीस कार्यप्रवण करीत असतो. त्यामुळे व्यक्ती समाजविरोधी कृत्य करीत नाही. समाजाच्या कल्याणाचे कार्य म्हणजे पुण्यकर्म व समाजाला घातक कृत्य म्हणजे पापकर्म असे संबोधले जाते.

3) **शिक्षण** :— शिक्षणाने ज्ञानप्राप्ती होते. योग्य—अयोग्य, चांगले—वाईट यातला फरक कळतो. तर्कशक्ती वाढते व कोणत्याही दृश्य नियंत्रणाशिवाय व्यक्ती सामाजिक मुल्यांना धरुन चालते. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. मग ती औपचारिक मार्गाने किंवा अनौपचारिक मार्गाने घडत असो पण ती मानवी व्यवहारांवर सतत नियंत्रण ठेवून असते व मानवास शिस्तबध्द जीवन जगण्यास समर्थ करीत असते.

4) **राज्य व कायदे** :— परिस्थितीनूसार समाजाला आवश्यक असलेले कायदे करुन ते लोकांना पाळावयास लावून समाजात कायदा व सुव्यवस्था टिकविण्याचे महत्त्वाचे कार्य

राज्य करीत असते. कायद्याचे पालन न करणाऱ्यास शिक्षेची तरतूद असते. कायदा म्हणजे समाजहिताचय दृष्टिने त्यातील व्यक्तींना पाळावयाचे राज्यसत्तेने केलेले नियम. समाजविघातक चालीरिती कायद्याने नष्ट केल्या जातात. उदा. सतीची चाल, हुंडा पध्दती इ. आज कायद्याने सामाजिक जीवनाची सर्व अंगे नियंत्रित केलेली आहेत.

5) **परंपरा** :— समाजात मान्य असलेल्या कल्पना, मते, बोलण्या—वागण्याच्या पध्दती ह्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. परंपरा ही जुने तेच सोने मानणारी एक प्रभावी शक्ती आहे. त्यामुळे पिढ्यानपिढ्या त्याच कल्पना, श्रध्दा व पध्दती समाजात सातत्याने टिकून राहिलेल्या आढळतात. कोणतीही नवीन गोष्ट करतांना आपण ती परंपरेच्या विरुध्द करत आहोत. ही जाणीव व्यक्तीस नवीन गोष्ट करण्यापासून परावृत्त करते व त्यामुळे परंपरा ह्या समाजातील नियंत्रित करतात.

6) **जनरीती** :— प्रत्येक समाज ज्या त्या वेळच्या नैसर्गिक परिस्थितीशी जुळवून घेवून सहकार्याने जगण्यासाठी समाज प्रयत्नशील असतो. ह्या प्रयत्नांमधूनच समाजात उत्पादन, उपभोग, अन्न तयार करणे, साठवणे इत्यादींच्या विविध पध्दती अस्तित्वात येतात. वेशभूषेचे प्रकार, परस्परांचे स्वागत करण्याच्या पध्दती, बोलण्याच्या पध्दती इत्यादींच्या बाबतीत प्रत्येक संस्कृतीत वेगवेगळ्या लोकरीती आढळतात. परंपरेप्रमाणेच ह्या सुध्दा एक पिढीकडून दुसऱ्या पिढीस हस्तांतरित होतात.

7) **रुढी** :— जनरिती समाजात रुढ झाल्या व त्याप्रमाणे जनहिताची कल्पना रुढ झाली की, त्याचे रुढीत रुपांतर होते. त्याचे पालन योग्य वा अयोग्य, याबाबत विचार विमर्श होवू लागतात. सतत प्रचारात असलेले व अंगवळणी पडलेले, वर्तणुकीचे प्रकार चांगले वाटू लागतात. समाजहिताच्या दृष्टीने ते पाळणे, सामाजिक बंधन मानले जाते. अशा रितीने रुढी निर्माण होतात.

8) **चालीरिती वा प्रथा** :— चालीरिती ह्या कृतीवाचक असतात. त्या पिढ्यानपिढ्या पाळल्या जातात. तत्कालिन परिस्थितीत निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने चालीरिती प्रचारात आल्या. त्या जनरितीप्रमाणे सहज प्रचारात आल्या नसून प्रयत्नपूर्वक अस्तित्वात आणल्या गेल्या. उदा. आजाऱ्यास भेटावयास जाणे, जातांना फळे, फुले घेवून जाणे, अपत्यप्राप्ती निमित्त मिठाई वाटणे, अभिनंदन करणे, आहेर करणे इ. अंधश्रध्दा व धार्मिक भावनेत काही चालीरितींचे मुळ आढळते.

9) **आचार** :— सामाजिक जीवन सुरळीत चालण्यासाठी प्रत्येक मनुष्य स्वतःवर काही बाबतीत बंधने घालून घेतो. समाजहित समोर ठेवून काही गोष्टी न करण्याचे मान्य करतो.

सामाजिक कर्तव्याची जाणीव, धार्मिक व आध्यात्मिक दृष्टिकोन या सर्वातून विशिष्ट पध्दतीने वागणेच इष्ट आहे असे व्यक्तीला वाटू लागते. सामाजिक स्वास्थ कायम राखण्याच्या दृष्टीने हे आचार आवश्यक असतात.

लोकमत, प्रचार, संस्कार, कला ह्या बाबींचे सुध्दा सामाजिक नियंत्रणात महत्त्वाचे स्थान आहे.

**उद्दिष्ट्ये** :–

1) सामाजिक नियंत्रणाने प्रत्येक मानवास समाजाचा घटक म्हणून जास्त फायदे मिळावेत व व्यक्ती या नात्याने कमीतकमी अडचणी निर्माण व्हाव्यात ह्या दृष्टीने विचार मांडणे.

2) सामाजिक नियंत्रणामुळे सामाजिक व्यवस्थेत पूरक अशा व्यक्तींच्या भावनांचा आदर केला जावा. नियंत्रणाने मानवता, न्यायप्रियता या तऱ्हेच्या भावनांना धक्का बसू नये याविषयी चर्चा करणे.

3) व्यक्तीस व्यक्ती म्हणून समाजात जगतांना सामाजिक हीत ही दृष्टीआड होणार नाही अशारितीने सामाजिक नियंत्रण असणे जरुरी आहे याविषयी अभ्यास करणे.

4) प्रत्येक समाजात परिस्थिती बदलत असते. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास जुनी मुल्ये बदलने जरुरी आहे याविषयी अभ्यास करणे.

5) गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व समाजामध्ये स्थैर्य टिकून राहण्यासाठी सामाजिक नियंत्रणाचे महत्त्व सांगणे.

6) सामाजिक नियंत्रणाची साधने विपूल प्रमाणात असूनही पांढरपेशीय गुन्हे घडतात व ते दिवसेंदिवस वाढत आहेत याविषयीचा अभ्यास करणे.

**गृहीतके** :–

1) व्यक्तीच्या वर्तणूकीवर नियंत्रण घालून तिला समाजसंमत मार्गाने जाण्यास भाग पाडता येते.

2) सामाजिक नियंत्रणातून समाजातील सर्व व्यक्तींच्या ध्येय व धोरणात तसेच वर्तणूकीत समानता आणता येवू शकते.

3) सामाजिक नियंत्रणातून समाजाची प्रगती साधण्यासाठी समाजात शांतता व सुव्यवस्था टिकविली जाते.

4) गुन्हेगारी वृत्तीला आळा घालण्यासाठी सामाजिक नियंत्रण महत्त्वाची भूमिका पार पाडते.

5) सामाजिक नियंत्रणाच्या साधनांच्या स्वरुपात परिस्थितीनूसार परिवर्तन होते.

**गुन्हा :—**

आधुनिक काळामध्ये गुन्हा व गुन्हेगारी या विषयांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो. गुन्हा ही समाजाला पोखरणाऱ्या अनेकविध प्रकारांपैकी एक भयंकर प्रकार आहे. याविषयी गुन्हे शाखा या नावाने एक स्वतंत्र शाखाच अस्तित्वात आहे. सामाजिक प्रगतीबरोबरच सामाजिक विघटनही होत असते. सामाजिक विघटन सामाजिक परिवर्तनाच्या गतीचे एक अंग आहे. सामाजिक नियंत्रणाचा भंग करण्याचा मानवी स्वभावधर्म पुरातन काळापासून दिसून येतो. त्यामुळे समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांचे उल्लंघन सतत होत असते.

पूर्वी अस्तित्वात असलेल्या गुंतागुंतीच्या कायद्यांमध्ये कायदेमंडळाने आणखी नविन कायदे करुन सामाजिक कायद्यांची संख्या वाढविलेली आहे. समाजातील विविध समस्यांपैकी गुन्हा ही समस्या महत्त्वपूर्ण आहे. गुन्हे का होतात? तो करण्यास व्यक्ती, समाज व परिस्थिती यापैकी कोण जबाबदार आहेत? असे असंख्य प्रश्न निर्माण होतात. सुशिक्षित समाजात अपराधाचे प्रमाण कमी असते असा सर्वसामान्य समज आहे. तसेच नीती व अनीती यांचा अपराधांशी कुठपर्यंत संबंध आहे, सर्व अनैतिक वर्तनप्रकार म्हणजे अपराध असे म्हणता येईल का? मग अपराध म्हणजे अधर्माचरण असा त्याचा अर्थ होतो का? हे प्रश्न अनुत्तरीत आहेत.

**पांढरपेशीय गुन्हेगारी :—**

सदरलौण्ड हे पहिले अपराधशास्त्री होते. ज्यांनी 1939 मध्ये समाजामध्ये पांढरपेशी किंवा व्यावसायिक गुन्हेगारीचा अभ्यास केला. पारंपारिक अर्थाने पांढरपेशीय गुन्ह्यांचा अर्थ तसा संकुचित आहे. याचा थेट संदर्भ सामाजिक, आर्थिक स्तरावरील गुन्ह्यांशी येतो. सदरलौण्ड म्हणतात, पांढरपेशीय गुन्हा उच्च आर्थिक, सामाजिक वर्गातील व्यक्तींद्वारे आपल्या व्यावसायिक क्रियेमध्ये कायद्याचे उल्लंघन करतात. उच्च सामाजिक, आर्थिक वर्गाची ओळख त्यांच्या धनसंपत्तीमुळे नाही तर त्यांचा सन्मान व प्रतिष्ठा यामुळे होते.

मार्शल क्लिनार्डने म्हटले आहे की, पांढरपेशीय गुन्हा मुख्यत: व्यापारी, व्यावसायिक व्यक्ती, राजनीतीज्ञ यांच्याद्वारे त्यांच्या व्यवसायामध्ये केलेले कायद्याचे उल्लंघन होय. काही लोकांनी उत्साहाच्या भरात पांढरपेशीय गुन्ह्यांचे क्षेत्र व्यापक केले आहे. त्याकरिता काही मार्ग अनैतिक असूनही ते कायद्याचे उल्लंघन नाही असे भासविले जाते. उदा. बोगस प्रमाणपत्र देणारे डॉक्टर, अवैध गर्भपात करणारे डॉक्टर, दुर्घटनेच्या वेळी खोटी साक्ष देणारे व्यक्ती, खोटा रिपोर्ट बनविणारे

व्यक्ती, ह्या सर्व व्यक्ती तसेच फीस घेवून याबद्दल सल्ला देणारे व्यक्ती हे समाजव्यवस्थेचे घटक आहेत व ते ह्या बाबीला अनैतिक असूनही नैतिक समजतात. ही सर्व कृत्य पांढरपेशीय गुन्ह्यांमध्ये येतात. सदरलौण्डने दोन प्रकारच्या व्यक्तींना पांढरपेशीय गुन्हेगार मानले आहे.

1) जो न्यायालयाद्वारे दोषी ठरलेला व सजा झालेला

2) ज्याला सजा देवू शकत असतांनाही तो विशीष्ट दबाव तंत्राचा वापर करुन खोट्या मार्गाचा वापर करुन अलगद सुटतो.

पांढरपेशीय गुन्ह्यांमध्ये खोटी जाहीरातबाजी व प्रसार करणे, कामगार कायद्यांचे उल्लंघन करणे, कॉपीराईट आणि पेटंटचे नियमांचे उल्लंघन करणे, आर्थिक भ्रष्टाचार करणे इत्यादी गुन्हे आहेत. तरीही उच्च वर्गातील लोकांद्वारे केले जाणारे सर्व गुन्हे पांढरपेशीय गुन्हे असू शकत नाही. केवळ विशेष सवलत (Job Oriented) आहे. कार्य करीत असतांना घडणारे गुन्हे पांढरपेशीय गुन्हे ठरतात.

**पांढरपेशीय गुन्ह्यांचे प्रकार :—**

हरबर्ट एडेलहर्जने व्यावसायिक पांढरपेशीय गुन्ह्यांचे चार प्रकार सांगितले आहेत.

1) व्यक्तीगत गुन्हा किंवा व्यक्तींद्वारे केले गेलेले गुन्हे. यात आयकर चोरी, उधार कृत्य, परत न करण्याच्या इराद्याने कर्ज घेणे, विम्यासंबंधी धोकेबाजी इ.

2) व्यवसाय करत असतांना काही कर्तव्यांचे उल्लंघन केले जाते. जसे लाच घेणे, भ्रष्टाचार करणे, छोटी—मोठी चोरी करणे इ.

3) प्रासंगिक गुन्हे तसेच व्यवसाय वृध्दीकरिता केले गेलेले गैरवर्तन. जसे की, खानपान किंवा औषधी यांच्या नियमांचे उल्लंघन, खोट्या जाहिराती, खोट्या औषधांची शिफारस इ.

4) व्यावसायिक स्वरुपाचे गुन्हे. जसे की, चिकित्सकीय धोकाधडी, लॉटरीतील धोक्याची योजना, म्युचुअल फंडमधील धोकाधडी, जमिनीतील घोटाळे, दानधर्मा संबंधी घोटाळे, संगीताची, साहित्याची चोरी इ.

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात व्यावसायिक गुन्हे किंवा घोटाळे झाले आहेत. हवाला घोटाळा, शेअर घोटाळा, साखरेचा घोटाळा, बँक घोटाळा, दुरसंचार घोटाळा यामध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. यातील कुठल्याही गुन्हेगाराला शिक्षा झाल्याचे आढळत नाही.

अशा व्यक्तींना पोलीस तात्काळ ताब्यात घेत नाही. कारण न्यायालयीन कार्यवाहीची किंवा बदली करतील याची भीती किंवा राजकीय दबाव ह्या बाबींची भीती वाटते.

## निष्कर्ष :—

1) पांढरपेशीय गुन्हेगारांना शोधणे अवघड बाब आहे.

2) कायद्याची कडक अंमलबजावणी करतांना अशा गुन्हेगारांची प्रतिष्ठा आड येते.

3) सामान्य गुन्हेगारांना व पांढरपेशीय गुन्हेगारांना शिक्षा देतांना फरक असल्याचे जाणवते.

4) पांढरपेशीय गुन्हे समाजामध्ये पूर्वीपासून चालत आलेले आहेत. सामाजिक नियंत्रणाच्या साधनाची योग्य अंमलबजावणी किंवा स्वीकार केल्यास गुन्हे घडणार नाहीत.

## सुचना :—

1) गुन्हेविषयक कायद्यांमध्ये अनेक त्रुटी आहेत त्या प्रथम दूर केल्या पाहिजेत.

2) पांढरपेशीय गुन्ह्यांची व्याख्या सुधारित स्वरुपाची असावी.

3) गुन्ह्यांविषयी केलेल्या कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे.

4) गुन्हेगारांवर निष्पक्षपातीपणे आणि कठोर खटला चालविला गेला पाहिजे.

5) सामाजिक नियंत्रणाचे पारंपारिक आणि आधुनिक अशा दोन्ही साधनांची पावित्र्य टिकवून अंमल करायला लावल्यास समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण कमी होईल.

## संदर्भ :—

1) राम आहुजा, मुकेश आहुजा — विवेचनात्मक अपराधशास्त्र, रावत पब्लिकेशन दिल्ली.

2) डॉ.दिलीप खैरनार — समाजशास्त्रीय मुलभूत संकल्पना, एज्युकेशन पब्लिशर्स औरंगाबाद

3) डॉ.कालिदास भांगे, प्रा.चांगदेव मुंढे — भारतातील सामाजिक व्यक्तीत्व आणि रचना, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

4) डॉ.प्रतिभा आहिरे — समाजशास्त्र संकल्पना व व्यक्ती.

5) यशवंत श्रीधर मेहेंदळे — समाजशास्त्राची मुलतत्त्वे.

6) डॉ.रा.ना.घाटोळे — समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, मेहेंदळे प्रकाशन, पुणे.